## निवृत्तीवेतन / कुटूंबनिवृत्तीवेतन धारकांना सुधारीत आवाहन

निवृत्तीवेतनधारकांकडून त्यांची जन्मतारीख, ई-मेल आयडी, पॅन क्रमांक इत्यादी माहिती मागविण्यासाठी माझ्या सहीचे पत्र माहिती व जनसंपर्क कार्यालयामार्फत पाठविण्यात आले आहे. या पत्राला निवृत्तीवेतनधारकांकडून चांगला प्रतिसाद प्राप्त होत आहे.

तथापि, याच आशयाचे एक सही नसलेले पत्र व ई-मेल आयडीमुळे काही निवृत्तीवेतनधारकांमध्ये संभ्रम निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे.

खरे तर, माहितीचे संकलन करुन निवृत्तीवेतन विषयक डेटाबेस 'अपडेट' करणे हे निवृत्तीवेतनधारकांच्याही हिताचे असल्याने, झालेला संभ्रम दूर व्हावा यासाठी, निवृत्तीवेतनधारकांनी त्यांचे नाव, ई-मेल आयडी, पॅन क्रमांक व मोबाईल क्रमांक इतकीची माहिती शक्य असल्यास pao@mahakosh.in या ई-मेल आयडी वर किंवा अधिदान व लेखा कार्यालयाच्या पत्त्यावर कृपया पाठवावी.

पत्ता - अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई,

लेखा कोष भवन, ए विंग, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

**यापूर्वी ज्या निवृत्तीवेतनधारकांनी माहिती पाठविली असेल त्यांनी पुन्हा पाठविण्याची आवश्यकता नाही.**

(वैभव राजेघाटगे)
अधिदान व लेखा अधिकारी

Scanned with CamScanner

वेळ : प्रत्येक शनिवार, सायंकाळी ५.०० ते ७.०० वाजता

दिनांक : ०५/०६/२०२०

मा. वैभव राजेघाटगे साहेब,
अधिदान व लेखा अधिकारी,
लेखा कोष भवन, ए विंग,
वांद्रे - कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व)
मुंबई - ४०००५१

संदर्भ : आपले पत्र क्र. अले / निवेझा / ०७
दिनांक ०५/०६/२०२०.

महोदय,

निवृत्ती वेतन धारकांचे प्रश्न सोडविण्यासाठी आमच्या संघटनेकडून प्रयत्न चालु असतात. आपले सहकार्य चांगले मिळते. दरमहाचे निवृत्तीवेतन देण्याबाबत आपण करीत असलेल्या प्रयत्नांचे निश्चितच कौतुक आहे.

निवृत्तीवेतन धारकांचेकडून त्यांचे नाव, पॅन क्रमांक, ई-मेल आयडी, भ्रमणध्वनी इत्यादी माहिती मागवित आहात त्याचे पत्र मिळाले. आम्ही त्यास व्यापक प्रसिद्धी देवू.

आपण माहिती मागवून निवृत्तीवेतन धारकांना चांगल्या सेवा देण्यासाठी करीत असलेल्या प्रयत्नास या संघटनेचा निश्चितच पाठिंबा आहे.

धन्यवाद.

आपला स्नेहांकित,

[signature]

कार्यवाह
बृहन्मुंबई पेन्शनर्स असोसिएशन, मुंबई

Scanned with CamScanner